# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांची कार्ये व कर्तव्ये

## (Functions & duties)

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांची प्रमुख कार्ये व कर्तव्ये पुढीलप्रमाणे आहेत :-

(क) वीज निर्मिती आणि वितरण करण्याच्या प्रयोजनासाठी विद्युत निर्मिती केंद्रे, प्रकल्प संबंधित तारमार्ग आणि उत्पादन, निर्मिती वापर साठवण, मोजणी यांच्या संबंधातील बाबी व या साठीची जागा संपादित करणे, स्थापन करणे, त्यांचे बांधकाम करणे, स्वीकार करणे, ती उभारणे, त्यांची मांडणी करणे, त्यांचे कार्यचालन करणे, ती चालवणे, त्यांची व्यवस्था पाहणे, परिरक्षण करणे, परिवर्धन करणे, त्यात फेरबदल करणे, त्यांचे नवीकरण करणे, आधुनिकीकरण करणे, त्यांचे कार्य करणे व उपयोग करणे.

(ख) विद्युत ऊर्जा खरेदी, आयात, निर्यात, उत्पादन व्यापार, निर्मिती किंवा अन्यथा तिची देवघेव करणे, तसेच वीज निर्मिती, वितरण अथवा व्यापार यांमध्ये कार्यरत असलेलया दुय्यम कंपन्या सहयोगी कंपन्या व संलग्न कंपन्या यांच्यासह इतर कंपन्यांच्या व संस्थांच्या कार्यक्रमांबाबत सहयोग देणे आणि विद्युत निर्मिती केंद्रे, सहायक तारमार्ग यांचे कार्यचालन व परिरक्षण करण्याशी संबंधित आणि विद्युत ऊर्जा उत्पादन, निर्मिती वापर, साठवण आणि मोजणी, वितरण व पुरवठा यांच्याशी संबंधित बाबींवर त्यांना सहाय्य करणे व सल्ला देणे.

(ग) विद्युत निर्मिती प्रकल्पांसाठी आवश्यक असणारी वितरण केंद्रे, केबल, तारा, संचायके, संयंत्रे, मोटार, मीटर, उपकरणे, वितरण सहाय्यभूत सेवा, विद्युत ऊर्जा पुरवठा सामग्री यासह जागा संपादित करणे, स्थापन करणे, त्यांचे बांधकाम करणे, स्वीकार करणे, ती उभारणे, त्यांची मांडणी करणे, त्यांचे कार्यचालन करणे, ती चालवणे, त्यांची व्यवस्था पाहणे, परिरक्षण करणे, परिवर्धन करणे, त्यात फेरबदल करणे, त्यांचे नवीकरण करणे, आधुनिकीकरण करणे, त्यांचे कार्य करणे व उपयोग करणे.

(घ) खाणींचे साठे आणि खुल्या व भुयारी अशा दोन्ही खाणी तसेच दगडाच्या खाणी यांचा शोध लावणे, त्यांचा शोध घेणे, विकास करणे, पूर्ण उपयोग करणे, चालवणे त्यांचा कारभार पाहणे, व्यवस्था पाहणे, नियंत्रण ठेवणे. त्या सुसज्ज करणे, त्यांचा खर्च देणे किंवा त्यासाठी हातभार लावणे, तसेच खाणींचे साठे राखणे व त्यात सुधारणे करणे. खनिजे उपयोगात आणता येतील अशाप्रकारे त्या तयार करणे, संहत (concentrate) करणे आणि त्यांचे शुद्धिकरण करणे यासंबंधातील संयंत्रे चालवणे, त्यांचा व्यवहार चालवणे आणि त्यांची व्यवस्था पाहणे आणि या कार्यक्रमांशी संबंधित सर्व प्रकारची कामे आणि सोयी सुविधा उभारणे, त्यांचे परिरक्षण करणे आणि त्यात सुधारणा करणे आणि या प्रयोजनासाठी कोळशाच्या, लिग्नाइटच्या आणि इतर खाणी, वायू आणि हायड्रोकार्बनचे साठे आणि कंपनीची प्रमुख उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कोणतीही / कोणत्याही व्यक्ती, महामंडळ, कंपनी, सरकार (सरकारे) किंवा स्थानिक संस्था यांच्याकडून साध्य केलेल्या गोष्टींसह पारंपारिक व अपारंपारिक ऊर्जास्त्रोतांचे सर्व प्रकार, पट्ट्याने घेणे, बदल्यात घेणे, एकत्रीकरण करून घेणे, त्यांचे हस्तांतरण करणे, लायसन्स, सवलत, करार यांद्वारे घेणे आणि त्यांची खरेदी करणे वा अन्यथा त्या संपादित करणे.

(ङ) राज्य शासनाच्या मालकीची हायडल केंद्रे कार्यान्वित करणे, चालविणे, त्यांचे व्यवस्थापन करणे, विकत देणे, परिरक्षण करणे, त्यात बदल करणे, त्यांचे नूतनीकरण करणे, आधुनिकीकरण करणे, त्यांचे बांधकाम करणे आणि वापर करणे ही कामे करण्याचे चालू राहील.

## महानिर्मिती कंपनीचे ध्येय (VISION)

१. सामाजिक उत्तरदायित्वाच्या जाणिवेतून (भूमिकेतून) स्पर्धात्मक दरात महाराष्ट्र राज्यांसाठी सातत्याने पुरेशी वीजनिर्मिती करणे.
२. महाराष्ट्र राज्यासाठी रास्त दराने आणि सामाजिक जबाबदारीने सातत्याने पुरेशी वीजनिर्मिती करणे.
३. महाराष्ट्राची विजेची गरज स्पर्धात्मक दराने आणि सामाजिक जबाबदारीने पूर्ण करण्यासाठी वीजनिर्मितीत सदैव कार्यरत असणे.
४. रिप्लेसमेंट प्रकल्प नियोजनांतर्गत जुने व कमी क्षमतेचे संच बदलून त्याऐवजी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिक क्षमतेचे संच उभारण्याचे टप्पानिहाय नियोजन.

## महानिर्मिती कंपनीचे धोरण (MISSION)

१. राज्याची भविष्यातील विजेची गरज पूर्णतः भागविण्यासाठी प्रयत्नशील राहणे. तसेच पुरेशा राखीव वीजनिर्मितीसाठी कंपनीला मोलाचा ठरेल अशा विकासासाठी पुढाकार घेणे.

२. ऊर्जानिर्मितीच्या क्षेत्रात सौर, पवन, वायु, जलविद्युत आदि स्त्रोतांचा वापर करुन विविधता आणणे, तसेच जीवाश्म इंधनाचा जबाबदारीने वापर करुन कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमीतकमी करणे.

३. ऊर्जानिर्मितीचा खर्च नियंत्रित करुन तसेच आपली कामगिरी व कार्यक्षमता सातत्याने उत्कृष्ट ठेवून रास्त दरातील वीजनिर्मितीसाठी वचनबध्द असणे.

४. कंपनीच्या सर्व हितसंबंधी घटकांना लाभदायक ठरेल अशाप्रकारे चापल्य दाखवून हिंमतीने आपले उद्योग क्षेत्र विस्तारित करणे, तसेच आर्थिक चक्रात व ऊर्जेच्या गतिमान बाजारपेठेत नेहमी यशस्वी होण्यासाठी अनुरुप असे बदल करणे.

५. वीजनिर्मिती केंद्रासमीपच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या स्थानिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी पराकाष्ठा करणे.

६. वीजनिर्मितीतील सध्याची कमतरता लवकरात लवकर भरुन काढून वीजनिर्मितीतील जास्तीत जास्त वाढ करण्यासाठी महानिर्मिती कटीबद्ध आहे. एकीकडे जुन्या संचांमधून जास्तीत जास्त वीजनिर्मितीचे आव्हान पेलताना व कोळशाच्या उपलब्धतेनुसार जास्तीत जास्त वीजनिर्मितीसाठी महानिर्मितीचे अथक प्रयत्न सुरु आहेत. आगामी काळात वाढीव वीज निर्मितीतून त्याचे प्रत्यंतर लवकरच सर्वांना येईल.

-----------